



# पारनेर दर्शन






वर्ष ३ , अंक ६९, रविवार, २ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर शहरात चोरट्यांचा धुमाकूळ

## संभाजीनगर दहशतीखाली

**पारनेर : प्रतिनिधी**

पारनेर शहरातील संभाजीनगर परिसरात सात आठ चोरटयांनी दहशत निर्माण करत धुमाकूळ घातल्याने या भागातील नागरीक भितीच्या सावटाखाली आहेत.

गुरूवारी रात्री पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास सात ते आठ चोरटे या परिसरात घुसले. चोरटे एका प्राध्यापकांच्या घरात डोकवत असल्याचे त्यांच्या कुटूंबियांच्या लक्षात आल्यानंतर चोरटयांनी तिथून पळ काढला. त्यानंतर समोरच्या दोन अपार्टमेंटला लक्ष्य करत चोरटयांनी तिथे दहशत निर्माण केली. चोरटे अपार्टमेंटमध्ये घुसल्याचे काही रहिवाशांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी एकमेकांना सावध केले. रहिवासी आरडा ओरडा करत असतानाही त्याला न बधता चोरटे अपार्टमेंटमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न करत होते. मात्र रहिवाशांच्या प्रतिकारानंतर चोरटे तिथून बाहेर पडले, मात्र त्याच परिसरात दडी धरून बसलेले चोरटे पुन्हा अपार्टमेंटला लक्ष्य करण्याच्या तयारीत होते. चोरटयांचा धुमाकूळ सुरू असताना काही नागरीकांनी पोलीस स्टेशनला फोन करून या घटनेची माहीती दिली.

बऱ्याच विलंबाने पोलीसांचे वाहन आल्यानंतर चोरटयांनी तिथून पळ काढला. पोलीस वाहन पुढे गेल्यानंतर चोरटे पुन्हा अपार्टमेंटजवळ आले, मात्र अपार्टमेंटमध्ये प्रवेश न करता ते पुढील निर्जन स्थळी लपून बसले. पोलीसांचे वाहन आल्यानंतरही चोरटे याच परिसरात ठाण मांडून बसल्याने ते किती निर्ढावलेले असावेत याची कल्पना येते.

दरम्यान, हंगे येथे सहा दरोडेखोरांनी साठे वस्तीवर दरोडा टाकून दोघांना गंभीर जखमी करत साडेसात लाख रूपयांचा ऐवज चोरून नेला ही घटना ताजी असताना कडूस व शिरापूर येथेही घरफोडया झाल्या. त्यापाठोपाठ आता चोरटयांनी पारनेर शहरातील उपनगरांनाही लक्ष्य केल्याने रहिवाशांमध्ये घबराटीचे वातावरण आहे.

### यापूर्वीही अपार्टमेंटमध्ये चोऱ्या

*यापूर्वी याच अपार्टमेंटमध्ये भरदिवसा तीन फ्लॅट फोडण्यात आले होते. या चोऱ्यांमध्ये चोरांच्या हाती फारसे काही लागले नसले तरी भर दिवसा अपार्टमेंटमध्ये घुसून फ्लॅट फोडण्याची हिंमत चोरटयांकडून होते हे महत्वाचे आहे. चोरटयांनी फ्लॅट फोडल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखलही झाले मात्र त्यावेळी गुन्हा दाखल करण्याची तसदी पोलीसांनी घेतली नव्हती. त्याच वेळी कठोर कारवाई झाली असती तर चोरटयांनी या परिसरात पुन्हा पाऊल ठेवण्याची हिंमत केली नसती अशा प्रतिक्रीया या भागातून येत आहेत.*



### आळसलेले पोलीस !

*संभाजीनगरमधील वसाहतीमध्ये चोरटे आल्याची माहीती पारनेर पोलीस ठाण्यात कळविण्यात आल्यानंतर पोलीसांचे वाहन उशिराने घटनास्थळी पोहचले. वाहनासोबत आलेले पोलीस आळसलेले होते. शाळकरी मुलांनीही पोलीसांची देहबोली ओळखली. झोपेतून उठून चोरटयांचा शोध घेण्यासाठी आलेले चोरटयांचा काय शोध घेणार असा प्रश्न शाळकरी मुले विचारत होती.*

### भय इथले संपत नाही !

*गुरूवारी पहाटे दोन ते साडेतीनच्या दरम्यान चोरटयांनी धुमाकुळ घातल्यानंतर संभाजीनगरमधील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण आहे. शुक्रवारी सायंकाळी परीसरातील महिला एकत्र येत आज काही होणार नाही ना अशी शंका उपस्थित करून चिंता व्यक्त करताना दिसत होत्या. दरम्यान शुक्रवारी रात्री पोलीसांचे गस्त पथक या भागावर लक्ष ठेऊन होते. तर रहिवासीही सावध पवित्र्यात होते.*

## तरूणाची अल्पवयीन मुलीस धमकी

**वाडेगव्हाण : प्रतिनिधी**

मला तु फार आवडतेस, तु माझ्याशी लग्न कर नाहीतर मी तुझ्या अंगावर ॲसीड टाकेल आणि तुझ्या घरच्या लोकांना मारून टाकेल अशी धमकी वाडेगव्हाण येथील तरूणाने अल्पवयीन मुलीस दिल्याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात तरूणाविरोधात पोस्को कायद्यान्वये विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात अल्पवयीन मुलगी सकाळी साडेदहा वाजता कॉलेजला जाण्यासाठी वाडेगव्हाण बस थांब्यावर उभी राहिली असता ती एकटी असल्याचे पाहून प्रित शरद बोरगे हा तिच्याजवळ आला. मुलीजवळ दुचाकी उभी करून तु माझ्यासोबत लग्न कर. तु मला फार आवडतेस असे म्हणत प्रित याने मुलीचा हात धरून त्याच्याकडे ओढत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तु माझ्यासोबत लग्न केले नाही तर मी तुझ्या अंगावर सिड टाकेल. तुझ्या घरच्या लोकांना जीवे मारून टाकेल अशी धमकी दिली. अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून सुपा पोलीस ठाण्यात प्रित बोरगे याच्याविरोधात पोस्को तसेच विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त !

## १ लाख कोटींचा तोटा सहन करत मध्यमवर्गाला भेट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१ फेब्रुवारी २०२५ रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात प्राप्तीकर स्लॅबमध्ये बदल करण्यात आला असून १२ लाखापर्यंत उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. गेल्या अर्थसंकल्पात कराचे दर वाढवण्यात आले होते आणि यावेळी सरकारने मध्यम वर्गीयांसाठी काही दिलासादायक पावले उचलणे अपेक्षित होते. जी उचलण्यात आल्याचे दिसून येतं आहे. या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवर १ लाख कोटींचा बोजा पडणार आहे. मात्र तो सहन करुन सरकारकडून ही भेट मध्यमवर्गाला देण्यात आली आहे.

**अर्थमंत्री निर्मला सीतारमण काय म्हणाल्या :** २०२० च्या अर्थसंकल्पात जेव्हा सरकारने नवीन कर प्रणाली लागू केली, तेव्हा लोक ती स्वीकारण्यास तयार नव्हते, असे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी म्हटले होते. त्यांनी सांगितले की, प्राप्तीकरदात्यांना जुनी कर प्रणाली नवीन कर प्रणालीपेक्षा चांगली आणि अधिक फायदेशीर वाटत होती. पण आता देशातील ६५ टक्क्यांहून अधिक करदात्यांनी नवीन कर प्रणाली स्वीकारली आहे. म्हणजेच प्रत्येक ३ पैकी २ लोक नवीन कर प्रणाली अंतर्गत प्राप्तीकर भरत आहेत. गेल्या एका वर्षात या डेटामध्ये बरेच बदल झाले आहेत.



*अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, पुढील आठवड्यात नवीन प्राप्तीकर विधेयक आणले जाईल. आम्ही निर्यात क्षेत्रात योजना सुरू करू. एमएसएमईंना परदेशात टॅरिफ सहाय्य मिळेल. पुढील आठवड्यात नवीन विधेयक आणले जाईल. या प्रत्यक्ष कर सुधारणा नंतर स्पष्ट केल्या जातील. विमा क्षेत्रासाठी एफडीआय मर्यादा वाढवणार आहे अशाही घोषणा त्यांनी केल्या.*

### नव्या करप्रणालीनुसार कर कसा लागणार ?

- ० ते ४ लाख रुपये उत्पन्न ................कर नाही
- ४ ते ८ लाख रुपये उत्पन्न .................५ टक्के कर
- ८ ते १२ लाख रुपये उत्पन्न.................१० टक्के कर
- १६ ते २० लाख रुपये उत्पन्न...............२० टक्के कर
- २० ते २४ लाख रुपये , त्यावरील उत्पन्न..३० टक्के कर

### जुनी कर व्यवस्था कशी ?

- ० ते २.५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर ...०%
- २.५ लाख ते ५ लाख रुपये उत्पन्नावर...५%
- ५ लाख ते १० लाख रुपये उत्पन्न........२०%
- १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्नावर.........३०%



## गणेश जयंती निमित्त रांजणगांवला भाविकांची गर्दी !

शिरूर, गणेश जयंतीचे निमित्त साधत रांजणगांवला भाविकांनी दर्शनासाठी आज मोठी गर्दी केली होती. श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने पहाटे ४ वा.अभिषेक व नैमित्तिक पूजा करण्यात आली. गणेश जयंतीनिमित्त गेल्या तीन दिवसांपासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

देवस्थानच्या वतीने श्रींचे समोर दुपारी १२ व सायं ६ वा. सहस्रावर्तने, महापूजा व महानैवेद्य दाखविण्यात आला. सकाळी ९ ते ११ अवधूत चक्रांकीत महाराज यांचे गणेश जन्मावर आधारित कीर्तन झाले. यावेळी विविधरंगी फुलांची मंदिर व परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने माघी गणेशोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी दुपारी २ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडेयांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# दोन कारच्या अपघातात तिघांचा मृत्यू

**बीड : प्रतिनिधी**

बीड मधील अहमदपूर - अहिल्यानगर मार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास दोन कार एकमेकांना समोरासमोर धडकल्याने मोठा अपघात झाला आहे. या अपघातात तीन प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात एवढा भीषण होता की, दोन्ही कारचा चक्काचूर झाला. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील चंदन सावरगाव येथे मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातातील मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असून मृतांची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

याबाबत मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार मध्यरात्रीच्या वेळी अहमदपूर आणि अहिल्यानगर मार्गावर दोन कार भरधाव वेगाने समोरासमोर धडकल्या. ही धडक एवढी जोरदार होती की, दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एक गंभीर अवस्थेत होता. त्याला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना मदत करण्याचा प्रयत्न केला.

वडगाव पोलिस ठाण्याचे पथक देखील घटनास्थळी दाखल झाले होते. या अपघातामुळे या मार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी देखील निर्माण झाली होती. मात्र, पोलिस प्रशासनाने तात्काळ वाहतूक सुरळीत केली. दोन्ही कारचा वेग जास्त असल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे.

### वेगावर नियंत्रण नसल्यामुळेच अपघात

*वेगावर नियंत्रण सुटल्याने रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज आला नाही. आणि त्यामुळे हा अपघात झाला असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हा अपघातीत इतका भयंकर होता की, दोन्ही गाड्यांचा पूर्णतः चक्काचूर झाला होता. यात मृतांची ओळख देखील अद्याप पटलेली नाही. या महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून योग्य उपाययोजना करण्याची मागणी परिसरातील नागरिक करत आहे. वेगावर नियंत्रण नसल्यामुळेच अपघात झाला आहे, असा दावा प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे*

# लाडकी बहिणीचे बनावट अर्ज करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

## मंत्री अदिती तटकरे यांची माहिती ; बनावट अर्जदारांना एकदाही सन्मान निधी नाही

**मुंबई : प्रतिनिधी**

बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणींवर पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

दरम्यान आदिती तटकरे पुढे बोलताना म्हणाल्या की, बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री



माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. महिला व बालविकास विभाग अर्जदारांच्या छाननीबाबत अत्यंत सजग असून कोणत्याही प्रकारची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. महिला मतदार डोळ्यासमोर ठेवून विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत सरसकट प्रत्येक अर्जदार महिलेला प्रति महिना दीड हजार रुपये खात्यात पाठवण्यात आले.

### जानेवारीमध्ये अडीच कोटी महीलांना मिळाला निधी

*राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जानेवारी महिन्याच्या हप्त्याच्या लाभाचं वितरण सुरु आहे. २४ जानेवारी २०२५ रोजी १.१० कोटी लाभार्थी महिलांच्या खात्यात सन्मान निधी वर्ग करण्यात आला. त्यानंतर २५ जानेवारीला १.३१ कोटी महिलांच्या खात्यात सन्मान निधी जमा करण्यात आला आहे. जानेवारी महिन्यात जवळपास २.४१ कोटी महिलांच्या खात्यात जानेवारी महिन्याचा लाभ जमा झाला आहे.*




निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# HMPV ची भीती!

**भारतात एचएमपीव्ही विषाणूच्या प्रकरणांमध्ये वाढ होत आहे. पुद्दुचेरीमधील मुलांमध्ये लागोपाठ तीन प्रकरणे समोर आली आहेत. चीनमध्ये ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस HMPV चे पहिले प्रकरण समोर आले आहे. त्यानंतर एचएमपीव्ही विषाणूने भारतासह अनेक देशांमध्ये दार ठोठावले आहे. एचएमपीव्ही विषाणू हा एक प्रकारचा श्वसन संक्रमण आहे जो वरच्या आणि खालच्या श्वसनमार्गावर परिणाम करतो. HMPV विषाणू मध्यम ते गंभीर असू शकतो. हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरू शकतो. पण एचएमपीव्ही विषाणूची लक्षणे वेळीच ओळखली गेली, तर त्याचे उपचार पूर्णपणे शक्य आहेत.**

- डोके दुखणे : सर्दी, खोकला आणि ताप ही एचएमपीव्ही विषाणूची सामान्य लक्षणे आहेत. या विषाणूची लागण झाल्यानंतर, एखाद्या व्यक्तीला प्रथम सर्दी, खोकला आणि ताप यासारखी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे जर तुम्हाला सर्दी आणि खोकल्याची समस्या असेल तर या चिन्हाकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. सर्दी, खोकला किंवा ताप आल्यास एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- सर्दी, खोकला आणि ताप : घसा खवखवणे किंवा दुखणे हे देखील HMPV विषाणूचे लक्षण असू शकते. वास्तविक, जेव्हा एखादी व्यक्ती HMPV विषाणूच्या संपर्कात येते, तेव्हा या स्थितीत घसा खवखवणे जाणवू शकते. घसा खवखवणे एखाद्या व्यक्तीला अस्वस्थ करू शकते. घसा खवखवल्यास आले आणि तुळस यांचा डेकोक्शन पिऊ शकता. यामुळे घसादुखीपासून आराम मिळतो.
- श्वास घेण्यास त्रास होणे : HMPV विषाणूच्या संपर्कात आल्याने श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. या विषाणूच्या संपर्कात आल्याने छातीत हलके दुखणे जाणवते. या स्थितीत संक्रमित व्यक्तीला छातीवर दाब जाणवू शकतो. त्याच वेळी, श्वास घेण्यात थोडा त्रास होऊ शकतो.
- वाहणारे नाक : एचएमपीव्ही विषाणूमुळे सर्दी होते. त्यामुळे नाक बंद होते. त्याच वेळी, काही लोकांना यामुळे नाक वाहण्याची समस्या देखील असू शकते. हिवाळ्यात नाक वाहणे अत्यंत सामान्य आहे. हिवाळ्यात बहुतेक लोकांना या समस्येचा सामना करावा लागतो. ही समस्या त्रासदायक ठरू शकते.
- डोकेदुखी किंवा शरीर दुखणे : एचएमपीव्ही विषाणूमुळे डोकेदुखी आणि अंगदुखी यांसारखी लक्षणे देखील दिसू शकतात. जर तुम्हाला सतत डोकेदुखी किंवा शरीर दुखत असेल तर या चिन्हाकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. शरीरदुखीची समस्या अनेक कारणांमुळे उद्भवू शकते. HMPV विषाणूच्या संपर्कात आल्यानंतर ३ ते ६ दिवसांत शरीरात वेदना होऊ शकतात.



## ‘एचएमपीव्ही’ विषाणूला घाबरू नका; शासनाच्या सूचनांचे पालन करा!

**सध्या चीनमध्ये Human Metapneumovirus (HPMV) उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँडमध्ये २००१ मध्ये आढळला. हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे, ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे, जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो. सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. तथापि खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये, या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.**

### हे करा...

- जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
- साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
- भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा.
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्या.

### हे करू नये

- हस्तांदोलन.
- टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर.
- आजारी लोकांशी जवळचा संपर्क.
- डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे.
- सार्वजनिक ठिकाणी थुंकणे.
- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे.

- **चीनमधून आलेल्या नवीन विषाणू Human Metapneumovirus (HMPV) अहवालांबाबत चिंतेचे कारण नाही. याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भीतीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नाही. तथापि या पार्श्वभूमीवर आपल्या कार्यक्षेत्रातील सर्वेक्षण अधिक गतिमान करुन सर्दी-खोकला अर्थात आयएलआय/ सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात यावेत, असे आवाहन आरोग्य सेवा, पुणेचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी केले आहे.**

# सारे काही इतरांसाठी कशाला?

**कळत-नकळत आपण ‘पीपल प्लीजिंग’ करत असतो. याचा अर्थ स्वतःचे नुकसान करून किंवा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून इतर व्यक्तींना सुखावण्यासाठीचे वर्तन. इतर व्यक्तींच्या भावना सकारात्मक ठेवणे किंवा त्यांना आनंदी सुखी ठेवणे ही माझी जबाबदारी आहे, अशा प्रकारचा ठाम विश्वास असतो. वरवर पाहता हे काही नकारात्मक असेल असे वाटत नाही. मात्र, ही सवय निरोगी नाही.**



खरे तर, प्रत्येक माणसाच्या भावना या त्याची स्वतःची जबाबदारी असतात आणि त्यांच्या भावनांवर, विचार करण्यावर इतर कुठल्याही व्यक्तीचा ताबा नसतो, हे आपण अगोदरच पाहिलेले आहे; त्यामुळे इतर व्यक्तींना सुखावण्यासाठी आपले वर्तन किंवा विचार बदलणे हे ‘लॉजिकल’ नाही. ‘पीपल प्लीजिंग’मध्ये मात्र हे सगळे ‘लॉजिक’ गळून पडते आणि कुठल्या ना कुठल्या उद्दिष्टाने कळत-नकळत आपण इतर व्यक्तींना काय सुखावेल, त्यांना काय आवडेल, काय रूचेल हा विचार करून आपले वर्तन त्याप्रमाणे बदलण्याचा प्रयत्न करत राहतो. त्रासदायक गोष्ट म्हणजे, अनेकदा हे करण्याच्या नादामध्ये आपण स्वतःच्या गरजाही बाजूला ठेवतो आणि स्वतःच्या कामांना, गरजांना डावलून दुसऱ्या व्यक्तीची मदत किंवा दुसऱ्या व्यक्तीला सुख देण्याचा प्रयत्न करतो. हे करताना मनात येणारे विचार हे प्रत्येक वेळी ‘कॉन्शियसच’ असतील असे नाही, तर आपण आपल्या नकळतही या दिशेला ढकलले जाऊ शकतो. आपण ‘पीपल प्लीझर’ आहोत की नाही हे कसे ओळखायचे?

### काय लक्षात घ्याल?

इतर व्यक्तींना आवडतील अशा गोष्टी करणे ही मानवी नात्यांमध्ये सर्वत्र आढळणारी नैसर्गिक गोष्ट आहे आणि ती खूप छानही आहे. सकारात्मक आहे. मात्र, ‘पीपल प्लीजर्स’मध्ये काही वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. जसे, की या इतरांना सुखावणाऱ्या गोष्टी किंवा वर्तन केल्यानंतर मिळणाऱ्या आनंदामध्ये नियमितता नसणे. काही ठिकाणी त्यांना मदत करायला किंवा इतर व्यक्तींना आवडणाऱ्या गोष्टी करायला आवडते. आपण चांगली व्यक्ती आहोत, इतरांची किती मदत करतो, अशी स्वतःबद्दलची सकारात्मक भावनाही त्यातून निर्माण होते. मात्र, त्याच व्यक्तींसोबत पुन्हा काही दिवसांनंतर किंवा काही काळ गेल्यानंतर त्या गोष्टी करताना आपली ऊर्जा कमी झाल्याचे जाणवते. इतरांना सुखावण्यासाठी काम किंवा कष्ट करावे लागतात असे वाटते. मीच सर्वांसाठी सगळे काही कायम करतो किंवा करते आणि ते मात्र माझ्यासाठी तेवढे करत नाहीत ही भावना मूळ धरू लागते. अनेकदा त्या व्यक्तींबद्दल तात्पुरती का होईना; पण चीड, स्वतःबद्दल अपराधी भावना, निराशाजनक नकारात्मक भावनाही निर्माण होऊ शकतात. समोरच्याला नाही म्हणायची इच्छा व गरज असूनही नकार देता न येणे हेही ‘पीपल प्लीजिंग’चे वैशिष्ट्य. त्यामुळे बऱ्याच नात्यांना कोणत्याच वैयक्तिक मर्यादा किंवा सीमा राहत नाहीत. अनेकांना ही सवयच लागल्यामुळे ते कायम आपोआप फारसा विचार न करता इतरांच्या मदतीला धावतात आणि तसे करताना बऱ्याचदा स्वतःच्या गरजांकडे पूर्ण दुर्लक्ष करतात.

### सतत इतरांची माफी

‘पीपल प्लीजिंग’चे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते सतत इतरांची माफी मागत असतात. अतिशयोक्ती म्हणून सांगत नाही, तर अगदी ज्या गोष्टी त्यांच्या ताब्यात किंवा हातात नाहीत, अशा गोष्टींसाठीही ते इतरांची माफी मागतात. अनपेक्षितपणे पाऊस आल्यामुळे त्यांचा मित्रांसोबत ठरलेला बेत रद्द झाला, तरीही ते त्यांच्या मित्रांची माफी मागू शकतात. कोणता ना कोणता संबंध ते आपल्याशी जोडून जी गोष्ट नकारात्मकरित्या घडली, त्या घटनेला स्वतःला जबाबदार धरतात. सतत इतरांच्या मदतीला धावत असल्यामुळे असेही पाहायला मिळते, की अनेकदा लोक त्यांचा फायदाही घेतात. हे वरवर पाहता नैसर्गिक वाटले, तरीही याच्या मधली मेख अशी आहे, की ज्या व्यक्ती ‘पीपल प्लीजर्स’ असतात त्यांना हे दिसत असूनही स्वतःला थांबवता येत नाही; कारण इतरांना सुखावणाऱ्या गोष्टी करणे ही त्यांच्यासाठी भावनिक गरज बनलेली असते. जी त्यांना स्वतःबद्दल चांगल्या भावना निर्माण करायला मदत करते किंवा इतरांसाठी आपण काही तरी करतो आहे किंवा इतरांच्या नजरेत आपण काही तरी चांगले होतो आहे, या भावनेने ते स्वतः सुखावतात. स्वतः त्या नजरेत तात्पुरते उंचावतात. ही सवय प्रत्येकामध्ये कमी-जास्त प्रमाणात व वेगवेगळ्या प्रकारचे गुणधर्म दाखवणारी आहे. प्रत्येकांसाठी सारखी नाही.

### हे तुम्ही अनुभवले असेलच

- सतत समोरच्या व्यक्तीचे ‘अप्रूव्हल’ किंवा मान्यतेची गरज भासणे हे तुम्ही अनुभवले असेल. आपल्या प्रत्येक विचारांना किंवा केलेल्या कृतीला समोरच्या व्यक्तीचे अप्रूव्हल मिळाले, तर आपण शांत राहू शकतो. समोरच्याचे अॅप्रूव्हल मिळाले नाही, तर मात्र अस्वस्थ व्हायला होते. परिणाम स्वाभाविकच त्यांच्या नात्यांवरही होतो.
- नात्यांमधून पूर्ण समाधान न मिळणे, आपण इतरांसाठी काही केले तरच आपल्यावर कोणी प्रेम करणारे आहे अशी भावना जाणवणे; तसेच स्वतःच्या गरजा आपल्या जोडीदाराला, मित्र-मैत्रिणींना किंवा नात्यातल्या इतर व्यक्तीला स्वतः न सांगता आल्यामुळे त्या गरजा अपूर्ण राहणे, मग भले त्या मानसिक गरजा असतील किंवा भौतिक गरजा असतील. अशा व्यक्ती कायम समोरच्या व्यक्तीला जसे हवे तसे बनण्याचा किंवा वागण्याचा प्रयत्न करत राहतात; त्यामुळे त्यांची स्वतःची ओळखही त्यांच्यासाठी अस्पष्ट असते.
- स्वतःशी प्रामाणिक राहता न आल्यामुळे स्वतःबद्दलचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान हाही कमकुवत झालेला असतो; त्यामुळे यांच्या नात्यांवर अजूनच नकारात्मक परिणाम होतो; शिवाय आत्मविश्वास खालावला असल्यामुळे व्यावसायिक आयुष्यातही त्याचे परिणाम अनेकांना पाहायला मिळतात. स्वतःच्या गरजा दुर्लक्षित करणे, त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न न करणे, स्वतः स्वतःशी आणि इतरांशीही प्रामाणिक न राहणे, नात्यांवर त्याचा परिणाम होणे या सगळ्याची परिणिती मानसिक स्वास्थ्य खालावण्यामध्ये होते. नैराश्य, ताण यांसारखे आजार आपली मुळे पसरू शकतात.

# सकारात्मक विचारांचा आनंद

**जीवन आनंद म्हणजे नक्की काय? आपण आनंदी आहोत, असे म्हणण्यासाठी कोणती मानके आहेत? साधारणपणे, आर्थिक स्थैर्य, मुलेबाळे, त्यांचे जीवन यशस्वीपणे मार्गस्थ होणे, समाजात मान-सन्मान आणि उत्तम आरोग्य या गोष्टी स्वतःच्या सुखासाठी आवश्यक असतात. त्याही पलीकडे समाजकार्यात रमणे, आसपासच्या अडल्या नडल्यांना मदत करणे, म्हणजेच परोपकारांमध्ये मोठा आनंद दडलेला असतो.**



समाजात दोन प्रकारची माणसे असतात. एक म्हणजे परोपकारी वृत्तीची आणि दुसरी म्हणजे सतत दुसऱ्यांचा मत्सर करणारी, त्यांना खाली ओढणारी, कुठले तरी खुसपट काढून कायम भांडणे आणि कोर्टकचेरी करणारी! आपण दुसऱ्यांना मदत करतो, त्यांच्या अडीअडचणीत साथ देतो, तेव्हा हे कर्मयोगाच्या भूमिकेतून करणे जरुरीचे आहे. आपण त्यांना मदत केली, म्हणून त्यांनी आपल्या नावाचा डिंडोरा पिटावा, आपल्याला त्याचे श्रेय द्यावे, याची बिलकुल अपेक्षा न करणे. काही जण आपले उपकार विसरून आपल्याशी बोलत नसतील अथवा नजर चुकवीत असतील, तर त्याबद्दल बिलकुल वाईट वाटून न घेणे. आपल्या योगदानाची कदर होत नाही, असे फक्त बाहेरच्याच जगात होते असं नाही. घरात, कुटुंबातही कलह होत असतात. घरात ज्येष्ठ भावाने आपल्या धाकट्या भावंडांचा लहानपणी सांभाळ केलेला असतो. वडिलांच्या बऱ्याच जबाबदाऱ्या अशा मोठ्या भावाच्या वाट्याला येतात. छोट्या भावंडांचा अभ्यास घेणे, त्यांची पुस्तके आणि वह्या विकत आणणे, वेष्टने लावणे अशी कर्तव्ये त्याच्या हातून आपोआप घडलेली असतात. भावंडे मोठी झाल्यावर काळाच्या ओघात अनेकदा त्यांना याचा विसर पडलेला असतो. अशा वेळी आपण आपले कर्तव्य केले, त्यामुळे भावंडे मार्गी लागली तेच आपले फळ, तेच आपले श्रेय; असा फक्त सकारात्मक विचार करावा. मुलाबाळांच्या संदर्भातही आताच्या जीवनशैलीमुळे वादाचे विषय निर्माण होत आहेत.

### आनंदी राहायचे असेल तर...

आई-वडिलांना आनंदी राहायचे असेल, तर जनरेशन गॅपमुळे उद्भवणाऱ्या घटनांशी जुळवून घेणे महत्त्वाचे आहे. आजकाल परधर्मातील किंवा परदेशी व्यक्तीशी विवाह बंधन जोडणे अगदी सहज झाले आहे. येथे जुन्या पिढीच्या विचारांची मरगळ मागे ठेवणे महत्त्वाचे आहे. तरुण पिढीला त्यांची स्पेस द्यायला हवी. उगीचच आम्ही पूर्वजन्मी काय पाप केले होते, असा टाहो फोडून दुःखी होऊ नये. थोडक्यात आपला आनंद स्वतःच मिळवायचा असतो. इतरांच्या कृतीमुळे तो आपल्यापासून हिरावून घेण्याचा अधिकार देऊ नये.

# ऑल इज वेल

**आनंद, मोद, सुख.... कितीही नावे असली, तरी भावना एकच आहे. ‘काखेत कळसा आणि गावाला वळसा’ ही म्हण आनंदासाठी अगदी लागू पडते. पुढ्यात आनंदाचे ताट वाढून ठेवले ना, तरी आपण नंतर येणाऱ्या दुःखाच्या पुराची चिंता करतो.**

आजकालच्या जगात आपण खूप अतिविचार आणि यश यांच्या आहारी जात आहोत. मग समोर आनंद असला, तरी दुःख, काळजी पदरात पाडून घेतो. एका जपानी पुस्तकात आनंद मिळविण्यासाठी ‘चालू क्षणात’ कसे जगता येईल, याविषयी सांगितले आहे. ‘इकीगाई’ असे त्या प्रसिद्ध पुस्तकाचे नाव. आनंदाशी नाते जोडायला वर्तमानाशी मैत्री करता यायला हवी. लहानपणीच्या आठवणी ‘खरा आनंद काय असतो’ हे सांगतात. खेळताना, बागडताना आपण तोच क्षण जगत होतो; पण आज मोठेपणी आपण डोळ्यांखालच्या काळ्या वर्तुळात हरवून चाललो आहोत. नवी स्वप्ने बघताना, छोट्या क्षणांची मजाच घेत नाही. आजकाल सगळे मोबाइल वापरतात. ‘व्हायरल’च्या जमान्यात पाहिलेल्या एका सुंदर चित्रफितीविषयी सांगते. त्यात एका व्यक्तीने रस्त्यातच खुर्ची टाकून, त्यावर एका फलकावर एकटेपणा आणि अपयशाच्या खाईत लोटल्या



गेलेल्यांसाठी संदेश लिहिला होता. ‘आजचा क्षण जरी कठीण असला, तरी उद्याची बाजी तूच जिंकणार!’ ‘चीअरअप’ करणारे संवाद साधले, की एकटेपणा दूर होतो. नवीन ऊर्जा मिळते. आनंदी असण्यासाठी समाधानाची शिदोरी गाठीला असणे गरजेचे आहे. जगताना थोडे दुःख झेलावे लागतेच; पण त्या काळातही आनंदी राहायचा मार्ग शोधायला हवा. एका गावात एक चित्रकार होता. गावात खूप पाऊस पडल्यामुळे पूर आला. सगळे गावकरी चिंताग्रस्त. शेतीवाडीचे नुकसान झाले. कर्जाची परतफेड करता येणार नाही, म्हणून भीतीनेच अनेकांनी जीव गमावला. तो चित्रकार मात्र प्रत्येक दिवशी आनंदी असायचा. त्यामागचे कारण विचारल्यावर तो सांगायचा, ‘हे निसर्गचक्र आहे. पूर थांबवणे माझ्या हातात नाही; पण शेवटच्या श्वासापर्यंत आनंदी राहणे माझ्या हातात आहे.’ सकारात्मकता हे आनंदाचे बीज आहे. आयुष्यात कितीही संकटे आली, तरी चेहऱ्यावरचा हसरा भाव आणि आनंद कधीही दूर सारायचा नाही. ‘थ्री इडियट्स’मधला एक संवाद खूप प्रसिद्ध आहे; तो म्हणजे ‘ऑल इज वेल!’ कालानुरूप सगळे बदलणार; फक्त विश्वास ठेवायला हवा.

### योग्य मार्ग आणि शुद्ध चित्त

आनंद कमावण्यासाठी योग्य मार्ग आणि शुद्ध चित्त हवे. तो एक ईश्वरी अंश आहे; जो सतत आपल्याला सुखावतो, आपल्याला अशा वळणावर घेऊन जातो, जिथे जिवाला पूर्तता लाभते. आनंदाशी मैत्री करायची, तर निसर्गाशी मैत्री हवी. निसर्गच पूर्णत्वाचा, आपल्या अस्तित्वाचा आत्मा आहे. इतरांसाठी जगण्यात, निःस्वार्थीपणात आनंद दडला आहे. लहान मुलांच्या अनमोल निरागसतेत आनंद लपला आहे. सण आणि उत्सव हे तर आनंदाचे स्रोत. फक्त उत्सवांचे दिवसच नाही, तर रोजच्या दिवसाला हसऱ्या चेहऱ्याने आणि मनापासून सामोरे जा. आजकाल आपण स्पर्धात्मक युगात जगतो; पण कोणाच्याही हरण्यात आनंद न मानता, आपल्या यशात इतरांनाही सहभागी करून घ्यायला हवे. आनंद वाटायचा आणि सुखी व्हायचे!

### अनुभवाचे बोल

संगणक अभियंता असलेल्या सायली काळे हिने सांगितले, की मी नुकतीच कंपनीमध्ये कामाला जायला लागले होते. काम आवडीचे असले, तरी त्याचा भार आणि त्याचा ताण याने अर्धी झाले. एक शांत श्वास घेता यावा, म्हणून मी छोट्या सहलीला जायचे ठरवले. सहलीचा दिवस ठरला आणि मिठाचा खडा पडला. माझी एक ऑफिस मीटिंग सहलीच्या दुसऱ्याच दिवशी अचानक ठरवली गेली. मीटिंगची सगळी तयारी केली होती; पण आजकाल म्हणतात ना ‘ओव्हर थिंकिंग’, म्हणजेच अतिविचाराने घात केला. सहलीत मी उद्याच्या मीटिंगचे काय होईल, याचाच विचार करू लागले. ना मी धड सहल अनुभवू शकले; ना धड शांतता! महत्त्वाचे म्हणजे, ती मीटिंग काही कारणास्तव पुढे ढकलली गेली.

## शॉर्ट न्यूज

### कर्जत-जामखेडमध्ये एमआयडीसी होणारच

कर्जत : कर्जत-जामखेड मतदारसंघामध्ये एमआयडीसी होणारच, असे सांगत यासाठी संघर्ष सुरू असल्याचे आमदार रोहित पवार कर्जत येथे एका कार्यक्रमात म्हणाले. आ. पवार म्हणाले, कर्जत जामखेड मतदार संघातील युवकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी एमआयडीसी आवश्यक आहे. मतदार संघात एमआयडीसी होणारच आहे. यासाठी पुढील काळामध्ये देखील यासाठी संघर्ष सुरूच ठेवणार आहोत आणि मला विश्वास आहे की या परिसरामध्ये लोकांच्या हाताला काम मिळावे यासाठी औद्योगीकरण हे होणारच आहे, असेही पवार म्हणाले.

### कोपरगावात प्लास्टिक विक्रेत्यांवर कारवाई

कोपरगाव : नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्या पथकाने प्लास्टिक विक्रेत्यांवर पुन्हा कारवाईचा बडगा उगारला असून तीन ठोक विकेत्यावर दंडात्मक कारवाई केल्याची माहिती मुख्याधिकारी सुहास जगताप यांनी दिली. शहरातील तीन बड्या व्यापाऱ्यांच्या दुकानात धाडी टाकुन प्लास्टिक विक्रीस ठेवलेला सरासरी २० किलो प्लास्टीक पिशव्या, ग्लास, वाट्यासह इतर साहित्य हस्तगत करुन उमेश पहाडे, जगन्नाथ दाभाडे व अनिल डागा यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. त्यांच्यावर साडेसात हजार रुपयांचा जागेवर दंड वसुल करण्यात आला.



### चंदनापुरीत पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

संगमनेर : तालुक्यातील चंदनापुरी आणि परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्याला जेरबंद करण्यात अखेर वनविभागाला यश आले. चंदनापुरी माथ्यावर असलेल्या धगाडी बाबा डोंगराजवळील केदार वस्ती परिसरात बिबट्या वनविभागाच्या पिंजऱ्यात अलगद अडकला. याआधी या परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात अनेक शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

### धारदार शस्त्राने तरुणावर सपासप वार

नगर : शहरातील बालिकाश्रम रस्ता येथे लक्ष्मी उद्यानासमोर रात्री एका तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा प्रकरण अपघात झाल्याचे कारणावरून घडला आहे. निखिल अंबादास इपलपेल्ली (वय २५, अहिल्यानगर) व त्याची बहिण खुशी आणि मित्र ओम नरेश थदाणी हे बालिकाश्रम रस्ता, लक्ष्मी उद्यानासमोर गेले असता दुचाकी (एमएच १६ सीएक्स ०४०८) वरून आलेल्या चार जणांनी त्यांच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांनी निखिल व त्याच्या मित्रास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

### सागर बेग यांचा प्रशासनाला मोठा इशारा

श्रीरामपूर : शहरातील राज्य महामार्ग मोठा असून दुकाने देखील मोठी आहे. त्यामुळे ५० फुटापर्यंत अतिक्रमण काढले तरी योग्य आहे. परंतु मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरील अतिक्रमण ५० फुटापर्यंत काढल्यास छोटे-मोठे व्यापारी उध्वस्त होईल. ४० फुटापर्यंत अतिक्रमण काढले तर व्यापारी व्यवसाय करतील. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण ४० फुटापर्यंत काढावे, अशी आमची मागणी आहे. प्रशासनाने दखल न घेतल्यास बेमुदत बाजारपेठ बंद ठेवण्यात येईल, असा इशारा राष्ट्रीय श्रीराम संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर बेग यांनी दिला.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार

## मंत्री आशिष शेलार यांची माहिती; दोन सिंह घेतले वर्षभरासाठी दत्तक

**मुंबई : प्रतिनिधी**

बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार असून आज राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुंबई उपनगर पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी याबाबत घोषणा केली. तसेच या उद्यानातील दोन सिंह वर्षभरासाठी त्यांनी दत्तक घेतले आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ड.शेलार यांनी आज बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा पाहणी दौरा केला. यावेळी उपनगराचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन, उपसंचालक रेवती कुलकर्णी, सहाय्यक वनरक्षक सुधीर सोनवणे, मुख्य सुरक्षा अधिकारी योगेश महाजन आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सध्या वाघ आणि सिंहाच्या दोन सफारी उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात बिबट्यांचे सापडलेले बछडे याच उद्यानात संरक्षित करण्यात आलेले आहेत. त्यांचे पालन करण्यात येते आहे. मात्र पर्यटकांना पाहण्यासाठी त्यांची सफारी उपलब्ध नाही. त्यासाठी सुमारे तीस हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तर सफारीसाठी प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे ५ कोटी खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात २० लाख पर्यटक भेट देतात. जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्राचे उत्पन्न वाढेल, अशी माहिती देऊन मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन यांनी मंत्री ड.शेलार यांच्यासमोर सादरीकरण केले.

दरम्यान, याबाबत आढावा घेतल्यानंतर मंत्री आशिष शेलार यांनी या क्षेत्रात नवी बिबट्याची सफारी सुरू करा, त्यासाठी लागणारा निधी वन खात्याकडून आणि जिल्हा नियोजन समितीमधून आम्ही देऊ, असे त्यांनी सांगितले. याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

### ४११ जणांना सुरक्षा कवच

*संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ४०० वन मजूर असून ते उन, वारा , पाऊस याची तमा न बाळगता तसेच वन्य प्राण्यांचा अधिवास असलेल्या क्षेत्रात स्वतःचा जीव धोक्यात घालून सतत गस्तीचे काम करतात. यातील बहूसंख्य हे आदिवासी बांधव आहेत.तर मानवी वस्तीमध्ये वन्य प्राणी घुसल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी जाणारी ११ जणांची टीम असून या सगळ्यांचा प्राण्यांशी थेट संपर्क येतो. मात्र या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यात आलेला नाही, ही बाब मंत्री ड.शेलार यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने याबाबत निर्देश दिले व या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यास सांगितले. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देऊ अशी ग्वाही ही त्यांनी दिली.*

### भारत, भारतीला पालकमंत्र्यांनी घेतले दत्तक!

*या उद्यानात भारत आणि भारती हे तीन वर्षाचे दोन सिंह नुकतेच २६ जानेवारीला गुजरात मधून आणण्यात आले आहेत. त्यांना वर्षभरासाठी मंत्री ड.शेलार यांनी दत्तक घेतले असून त्यांच्या पालनपोषणासाठी होणारा खर्च मंत्री ड.शेलार वैयक्तिक रित्या करणार आहेत.*






# सारंगवाडीत गावकऱ्यांनीच निवडलेल्या सरपंचावर गावकऱ्यांनी दाखविला अविश्वास



**हिंगोली : प्रतिनिधी**

- सारंगवाडीत गावकऱ्यांनीच निवडलेल्या सरपंचावर गावकऱ्यांनी दाखविला अविश्वास
- ठरावाच्या बाजूने ४२२ तर विरोधात ५१ मते
- मराठवाड्यातील दुसराच ठराव

औंढा नागनाथ तालुक्यातील सारंगवाडी येथे गावकऱ्यांतून निवड झालेल्या सरपंचाला गावकऱ्यांनीच ग्रामसभेतून मतदानाद्वारे पाय उतार केले आहे. शुक्रवारी ता. ३१ झालेल्या मतदानात ४२२ गावकऱ्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने तर ५१ जणांनी विरोधात मतदान केले. तर २६ मतदान बाद झाले आहे. ग्रामसभेतून अविश्वासाची हि मराठवाड्यातील दुसरीच वेळ आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील सारंगवाडी येथील ग्रामपंचायतीची निवडणुक सुमारे अडीच वर्षापुर्वी झाली आहे. या ग्रामपंचायतीमध्ये ९ सदस्य असून सरपंचांची निवड गावकऱ्यांतून झाले होती. त्यानंतर मागील काही दिवसांपासुन सदस्यांना सरपंच प्रभुलिंग महाराज यांच्यावर अविश्वास ठराव आणला होता. ९ विरुध्द एका मताने अविश्वास ठराव पारित झाला होता.

मात्र सरपंच प्रभुलिंग महाराज यांची निवड गावकऱ्यांतून झाल्यामुळे ग्रामसभा घेऊनच त्यातून अविश्वास ठरावाबाबत निर्णय घेण्यात यावा अशा सुचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या होत्या. त्यानुसार आज पिठासन अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, विस्तार अधिकारी सय्द जमीर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी सकाळी ९ ते साडे आकरा यावेळेत गावकऱ्यांची नांव नोंदणी करून घेण्यात आली होती. त्यानंतर दुपारी बारा ते चार यावेळेत मतदान झाले.

यामध्ये अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदानासाठी वर्तूळ हे चिन्ह देण्यात आले तर अविश्वास ठरावच्या विरोधात मतदानासाठी त्रिकोण हे चिन्ह देण्यात आले होते. त्यानुसार ४९९ गावकऱ्यांनी मतदान केले. दुपारी चार वाजल्यानंतर प्रत्यक्ष मतमोजणी करण्यात आली. यामध्ये अविश्वास ठरावाच्या बाजूने ४२२ तर अविश्वास ठरावाच्या विरोधात ५१ मते मिळाली तर २६ मते बाद झाली. त्यानंतर पिठासन अधिकाऱ्यांनी अविश्वास ठराव पारित झाल्याचे जाहिर केले.

दरम्यान, गावकऱ्यांनी निवडलेल्या सरपंचाला गावकऱ्यांनीच मतदानाद्वारे पाय उतार केल्याची हि मराठवाड्यातील दुसरी घटना असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रक्रियेसाठी ग्रामसेवक जी. पी. हलबुर्गे, महमद कलीम, एस. एम. आम्ले, राजकुमार बर्गे यांनी काम पाहिले.

# परमार्थ न करणाऱ्यांचे जीवन निरर्थक

## महंत विठ्ठल महाराज यांचे निरुपण; जमादारवाडीत कीर्तन महोत्सवाची सांगता

**जामखेड : प्रतिनिधी**



काला म्हणजे आपल्या जीवाचे त्या ईश्वरासी ऐक्य. काल्याच्या किर्तनात केवळ भगवान श्रीकृष्णाचे गोकुळातील चरित्र उच्चारावे. मनुष्य जन्माला येऊन ज्यांना परमार्थ करता आला नाही त्याचे जीवन निरर्थक आहे, असे निरुपण श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत श्री विठ्ठल महाराज यांनी केले.

संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त जामखेड तालुक्यातील जमादारवाडी येथील श्री संत वामनभाऊ गड येथे कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महंत श्री.विठ्ठल महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता झाली. महंत विठ्ठल महाराज यांनी कान्होबा महाराज यांनी चुराचुराकर माखन खाया । गौळणीका नंद कुमार कन्हैया ।। या हिन्दी गौळणीवर विठ्ठल महाराज यांनी कीर्तन केले.

विठ्ठल महाराज म्हणाले संत वामनभाऊ महाराज यांची आज हजारो ठिकाणी पुण्यतिथी साजरी होत आहे. आपल्याला मनुष्य जन्म मिळाला, आपण भाग्यवान आहोत. कारण याच जन्मात ईश्वर प्राप्ती करून घेता येते. मनुष्य जन्माला येऊन ज्यांना परमार्थ करता आला नाही त्यांचे जीवन निरर्थक आहे. काल्याच्या कीर्तनात कीर्तनकारांना मर्यादा असतात काल्याच्या कीर्तनात केवळ भगवान श्रीकृष्णाचे चरित्र वर्णन करायचे असते. अन्य कोणतेही विषय या वेळेला घ्यायचे नसतात. असे सांगून महाराजांनी यावेळी भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांचे वर्णन केले यावेळी सुंदर अशा गवळणी व संतांची प्रमाणे गायकांनी सादर केले त्यामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.शिंके लावियेले दूरी होतो तिघांचे मी वरी, हा दहीहंडीचा अभंग घेऊन श्री विठ्ठल महाराज यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली व आरती करून नंतर महाप्रसादाने या उत्सवाची सांगता झाली. या वेळी दादासाहेब महाराज सातपुते,मृदगांचार्य बाळकृष्ण महाराज राऊत, हरिदास गुंड, अंगद महाराज ढोले, जगन्नाथ धर्माधिकारी, नारायण काळे आदींनी साथसंगत केली. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी कैलास नेटके विजय गदादे, संतोष बारगजे अशोक वीर पांडुरंग कदम किरण आजबे, उद्धव आजबे, आण्णासाहेब नेटके, अर्जुन नेटके, अमोल नेटके आदींनी परिश्रम घेतले. संतांना शरण गेल्याशिवाय तुमचा उद्धार होणार नाही प्रत्येकाने स्वतःचा उद्धार करून घेतला पाहिजे. कारण शेवटी कोणीही आपल्या उपयोगी येत नाही. जीवाचे ब्रह्मासी ऐक्य करणे हा या मानव देहाचा मुख्य हेतू असला पाहिजे. मात्र माणूस हा अन्य ठिकाणी भरकटलेला आहे. सामान्य जीवाला या भवनदीतून तरुण जायचे असेल तर त्यांना संतांचे मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. म्हणून संतांना शरण गेल्याशिवाय तुमचा उद्धार होणार नाही, असे विठ्ठल महाराज यावेळी म्हणाले.

# जयहिंद पॉलिटेक्निकला फुटबॉल व कॅरम स्पर्धेत उपविजेतेपद

**फुटबॉल विभागीय स्पर्धेत बारा संघांचा सहभाग**

**नारायणगांव : प्रतिनिधी**




झील पॉलिटेक्निक, पुणे आणि आय. इ. डी. एस. एस. ए. (डी-१ झोन) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या फुटबॉलच्या विभागीय स्पर्धेमध्ये जयहिंद पॉलिटेक्निकचा संघ उपविजेता ठरला.

अंतिम सामना झील पॉलिटेक्निक व जयहिंद पॉलिटेक्निक यांच्यात पार पडला यामध्ये झील पॉलिटेक्निक संघ विजयी ठरला. या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी झाले होते. उपविजेत्या संघातील खेळाडूंना प्रा. अक्षय भोर यांनी मार्गदर्शन केले. तसेच अजिंक्य डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजीनियरींग येथे झालेल्या विभागीय कॅरम स्पर्धेत जयहिंद पॉलिटेक्निकच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळविले.

विजयी स्पर्धकांना प्रा. गौरी ढोले, प्रा. विपुल शिंदे, हर्षल रणपिसे यांनी मार्गदर्शन केले. या विजयाबद्दल जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दतात्रय गल्हे, प्राचार्य डॉ. स्वप्निल पोखरकर यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# निघोज नगरीवर सीसीटीव्हीचा वॉच

## बबुशाअण्णा वरखडे यांच्या हस्ते लोकार्पण

**निघोज : प्रतिनिधी**



### तीन लाख रूपये खर्च

*हिलव्हिजन या नामांकित कंपनीचे २४ सीसीटीव्ही कॅमेरे गावाच्या विविध भागांत बसविण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांची स्पष्टता अधिक असून त्यामुळे या कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आलेल्या व्यक्तीची ओळख सहजपणे होऊ शकेल. चोरी किंवा इतर गैरप्रकार होऊ नये यासाठी ही यंत्रणा उपयुक्त आहे. त्यासाठी कार्यालयीन निधामधून तीन लाख रूपयांचा खर्च करण्यात आला आहे.*

निघोज गावठाण परिसरात ग्रामपंचायतीच्या वतीने सुरक्षेच्या दृष्टीने विविध ठिकाणी २४ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून या प्रणालीचे बाजार समितीचे मा. उपसभापती बबुशाअण्णा वरखडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

यावेळी बोलताना वरखडे म्हणाले, पारनेर तालुक्यातील सर्वात मोठी ग्राम पंचायत म्हणून निघोजची ओळख आहे. मोठी बाजारपेठ व लोकसंख्येचा विचार करता निघोज ग्रामपंचायतच्या सरपंच चित्रा वराळ व त्यांच्या सहकार्यांनी सीसीटीव्ही यंत्रणा बसवून सुरक्षेच्या दृष्टीने टाकलेले पाऊल कौतुकास्पद आहे.

वरखडे पुढे म्हणाले, गेल्या चार वर्षात निघोज व परिसरात मोठया प्रमाणात विकास कामे माग लागली असून उर्वरीत कामे माग लावण्याची जबाबदारी ग्राम पंचायत पदाधिकारी व सदस्य यांची आहे.

उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यामागील संकल्पना स्पष्ट केली. गेल्या चार वर्षात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध विकास कामे माग लावण्याचा आम्ही प्रामणिक प्रयत्न केला असून भविष्यातही विकास कामांसाठी आम्ही कटीबध्द आहोत. शिक्षण, जलसिंचन, उद्योग, व्यवसाय, रस्ते, पाणी, वीज या सुविधांसाठीही आम्ही सतर्क असतो. विकासाबरोबरच सुरक्षितताही महत्वाची असून त्याच विचारातून सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे वरखडे म्हणाले.

प्रभाकर कवाद हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी सचिन वराळ पाटील, मंगेश लाळगे, सरपंच चित्रा वराळ, ज्ञानेश्वर वरखडे, सुमन कवाद, भास्कराव वराळ, गजानन ठुबे, महादेव वराळ, नाना पाटील लंके, शिवाजीराव लंके, भास्कर कवाद, दिलीप ढवण, अर्जुन लामखडे,दत्तात्रय काळे, सुनील उचाळे, अस्लम इनामदार, नागेश अनंत, रवि रणसिंग आदी उपस्थित होते. ग्रामसेवक संजय पवार यांनी सुत्रसंचलन केले तर शबनूर इनामदार यांनी आभार मानले.

# गोरक्षनाथ गडावर धर्मनाथ बीज उत्साहात साजरी

## २५ हजार भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथे गोरक्षनाथ गडावर धर्मानाथ बीज उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गडावर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. धर्मनाथ बीज निमित्त सुमार २५ हजार भाविकांनी दर्शन घेतले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष शंकर कदम यांनी दिली.

शहरापासून २२ किलोमीटर अंतरावर असलेले निसर्गरम्य धार्मिक ठिकाण आहे. धर्मनाथ बीज उत्सवानिमित्त राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येतात. गोरक्षनाथ महाराजांनी धर्मनाथांना नाथपंताची दीक्षा याच दिवशी दिल्यामुळे या उत्सवाला एक धार्मिक महत्त्व आहे. सकाळी अभिषेक, महापूजा, व त्या नंतर रामायणाचार्य अमोल महाराज सातपुते यांची कीर्तन सेवा झाली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# भोयरे गांगर्डात पुन्हा बिबट्याची दहशत

## ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण ; वनविभागाने बंदोबस्त करण्याची मागणी

**सुपा : प्रतिनिधी**

तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथे बिबट्यांची पुन्हा दहशत वाढली असून वन विभागाने त्यांचा पिंजरा लाऊन बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.भरवस्तीमध्ये बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे.

शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास शरद पवार यांना खिंडीमध्ये तर पवार वस्तीवर एका शेतकऱ्यास रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाले. चोहोबाजूंनी डोंगर असलेल्या भोयरे गांगर्डा परिसरात आजवर अनेकदा डोंगरांजवळ बिबट्यांचा वावर पहावयास मिळाला आहे. यावेळी मात्र बिबट्याने भेट पवार वस्तीवर मोर्चा वळविल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदा मुबलक पाऊस झाल्याने शेतांमध्ये कांदा, ज्वारी, मका, कडवळ, गवत आदी पीके जोमात आहेत. पवार वस्ती परिसरात बाजरी, उंच वाढलेले गवत असल्याने तिथे बिबट्याला दडण्यासाठी जागा आहे. त्यामुळेच भरवस्तीपर्यंत बिबट्या पोहचल्याने शुक्रवारची रात्र ग्रामस्थांनी जागून काढली.

### बिबटयाकडून हल्ले

*ग्रामीण भागात दिवसेंदिवस बिबटयाचा संचार वाढत आहे. मध्यंतरी पाडळीरांजणगांव येथे घराच्या पडवीमध्ये झोपलेल्या कामगारावर बिबट्याने जीवघेणा हल्ला केला. त्यात तो कामगार गंभीर जखमी झाला. तर भोयरे गांगर्डा येथील रसाळ वस्तीवर प्रभात डेअरीजवळ दादासाहेब जवक यांच्या घराजवळ बिबटयाचे दर्शन झाले होते. खडकवाडी येथे बिबटयाने शाळकरी मुलीवर हल्ला केला. त्या शाळकरी मुलीस जीव गमवावा लागला.*



### दिवसा वीजपुरवठा करा

*महावितरणकडून शेती पंपांसाठी रात्री आठ तास वीज पुरवठा करण्यात येतो. पाणी संपत आल्याने शेतकरी रात्र जागून काढत पीकांना पाणी देतात. शेतकऱ्यांचे ज्वारी, कांदा, हरबरा, मका, घास, कडवळ, गवत आदी पीकांना पाणी देण्याचे काम सध्या सुरू आहे. परिसरात बिबटयाचे दर्शन झाल्याने शेतकरी शेतामध्ये जाण्यास धजावत नाहीत. परिणामी महावितरण कडून दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी करण्यात येत आहे.*

*– **भाऊसाहेब भोगाडे,** माजी सरपंच*

# ग्रामसुरक्षा दलाच्या अध्यक्षपदी रविंद्र ढमढेरे

### उपाध्यक्षपदी सनी सोनवणे यांची सर्वानुमते निवड



**राळेगण थेरपाळ : प्रतिनिधी**

राळेगण थेरपाळ येथील ग्राम सुरक्षा दलाच्या अध्यक्षपदी रविंद्र प्रकाश ढमढेरे उपाध्यक्षपदी सनी सुर्यकांत सोनवणे यांची ग्रामसभेत सर्वानुमते निवड करण्यात आली.

या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले होते. यावेळी सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच ग्रामस्थ व अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पंकज कारखिले यावेळी म्हणाले गेली चार साडेचार वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून जनतेला सोयीसुविधा देण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामसेवक समन्वय साधून काम करीत आहेत.

गावविकासाचे धोरण ठेऊन लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत. गावविकास हेच ध्येय ठेवून आजपर्यंत मा.खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून कामे मोठ्या प्रमाणात होत असून येत्या सहा महिन्यांत सर्वाधिक कामे करण्यासाठी प्रयत्न आहे. तंटामुक्ती समिती, ग्रामसुरक्षा दल या निवडी सर्वानुमते झाल्या असून विकासकामांसाठी सातत्याने जनतेचे पाठबळ मिळत असल्याची माहिती सरपंच कारखिले यांनी दिली.

# शहाजापुरचे ग्रंथालय पाहून अधिकारी भारावले !

## मायडीया कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट

**शहाजापुर : प्रतिनिधी**

लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ वाचकांसाठी आवष्यक असलेली ग्रंथसंपदा तसेच शालेय विद्यार्थ्यांपासून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीचे संदर्भ ग्रंथ पाहून मायडीया कंपनीचे अधिकारी शहजापुर येथील कौडेश्वर वाचनालयात भाराऊन गेले.

मायडीया कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी लोपामुद्रा बॅनज व इतर अधिकाऱ्यांनी शहजापुरच्या वाचनालयास भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी छोटे असले तरी परिपूर्ण ग्रंथालय असल्याची प्रतिक्रीया बॅनज यांनी दिली.

बॅनज यांच्यासमवेत लिगल कौन्सीलर अतुलकुमार शर्मा, एचआर जनरल मॅनेजर पंकज यादव, एच आर मॅनेजर कपील धुमाळ हे



**कॅरिअर मायडीया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शहाजापुर येथील कौडेश्वर वाचनालयास भेट देऊन पाहणी केली.**

उपस्थित होते. सरपंच संगीता मोटे, ग्रंथापाल सुरेंद्र शिंदे यांनी अधिकाऱ्यांचे स्वागत केले.

भविष्यात वाचन चळवळ वाढविण्यासाठी काय करता येईल यावर यावेळी अधिकाऱ्यांनी विचारमंथन केले. कॅरीअर मायडीया कंपनीच्या वतीने कौडेश्वर वाचनालयास पुस्तकांसाठी कपाटे भेट दिली आहेत. त्या पार्श्वभुमीवर अधिकाऱ्यांनी भेट देत माहीती घेतली. दिवसेंदिवस वाचन संस्कृती लोप पावत चालली असून ती टीकविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी लागेल असे मत यावेळी श्रीमती बॅनज यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांशीही या अधिकाऱ्यांनी संवाद साधला.

याप्रसंगी शहाजापुरचे माजी सरपंच अण्णा मोटे ,आकाश मोटे, बबन सकट, जिल्हा परिषदेचे शिक्षक किरण पवार, कंपनीचे इतर अधिकारी, शालेय विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. ग्रंथालयाचे ग्रंथपाल उपस्थित कंपनी अधिकाऱ्यांचा सन्मान करत ग्रंथालयास भेट दिल्याबद्दल ऋण व्यक्त केले.

# बोल्हेगाव परिसरातील पत्र्याच्या शेडला आग

नगर : बोल्हेगाव परिसरातील पुलाखालील पत्र्याच्या शेडला अचानक आग लागली. या आगीत सुमारे दहा लाखांचे नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त होता आहे. शुक्रवारी (ता. ३१) रोजी सुमारे तीन वाजेच्या दरम्यान ही घटना घडली.बोल्हेगाव येथील कॉटेज कॉर्नर परिसरात सुरेश पंडित व अल्फाताप शेख याचे ए. आय. मोटर्स नावाचे गॅरेज आहे. आज शुक्रवारी अचानक या गॅरेज आग लागली. या घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे अग्निशमन विभागाचे एका वाहन घटनास्थळी होत आगीवर नियंत्रण मिळविले. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यावेळी अग्निशमन विभागाचे फायरमन शिवाजी गायकवाड, संदीप शिरसाठ, अमोल कर्हाडे, मच्छिंद्र धोत्रे आदी कर्मचारी उपस्थित होते.




**अळकुटी महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिरामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

# रक्तदानामुळे रूग्णांना संजीवनी

## भास्कर उचाळे यांचे प्रतिपादन

**शिरापुर : प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीमध्ये दानास विशेष महत्व आहे. जगाच्या पाठीवर दातृत्वाचा गुण फक्त भारतीयांमध्येच दिसून येतो. आजच्या युगामध्ये रक्तदानास अनन्यसाधारण महत्व असून रक्तदानामुळे एखाद्या रूग्णास संजीवनी मिळू शकते असे प्रतिपाद शिरापुरचे सरपंच भास्कर उचाळे यांनी केले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शिरापुर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मा. सरपंच भास्कर उचाळे हे बोलत होते.

उचाळे म्हणाले, अन्नदान, संपत्तीदान, जमीनदान, गोदान, ज्ञानदान, सेवादान, कन्यादान याबरोबरच आजच्या युगात रक्तदानासही महत्व आहे. अपघात तसेच विविध आजारांसाठी रक्ताची मोठया प्रमाणावर गरज भासते. मात्र रक्तपेढयांमध्ये रक्ताचा तुटवडा नेहमीच भासतो.म्हणून रूग्णांच्या सेवेसाठी रक्तदान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

प्राचार्य डॉ. कुंदा कवडे यांनी रक्तदानाची आवष्यकता प्रतिपादित करताना सांगितले की, रक्तदान हे जगातील सर्वात श्रेष्ठ दान आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आवष्यक त्यावेळी रक्तदान करावे.

यावेळी शिबिराथ विद्याथ, प्राध्यापक, प्राध्यापिका व ग्रामस्थ आदी ५७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी जि.प.चे मा. सभापती मधुकर उचाळे, भाउसाहेब डेरे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी उपसरपंच संतोष सिनारे, अंकुश वडणे, संभाजी नरसाळे, प्रकाश नरसाळे, प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. अमोल नालकर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. संजय जाधव, प्रा. दशरथ पानमंद, डॉ. शांता थोरात, प्रा. राजाराम गोरडे, प्रा. प्रियंका दिवटे, गोरख घोलप, सुर्यमाला भोर आदी उपस्थित होते. प्रा. पोपट सुंबरे यांनी प्रास्ताविक, प्रा सुषमा करकंडे यांनी सुत्रसंचलन तर प्रा. अर्जुन चाटे यांनी आभार मानले.

# पारनेर महाविद्यालयात ट्रॅडीशनल डे चा उत्साह !

**पारनेर : प्रतिनिधी**

पारनेर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक वेशभुषा दिनी विद्यार्थी, विद्यार्थीनींमध्ये उत्साह दिसून आला. विविध वेशभुषा केलेल्या विद्यार्थ्यांनी यावेळी विविध परंपरांचे दर्शन घडविले.

पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या ट्रॅडीशनल डे ला विद्यार्थी, विद्याथनींकडून मोठा प्रतिसाद लाभला. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या हस्ते ट्रॅडीशनल डे चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाचे प्रमुख डॉ. दत्तात्रेय घुंगार्डे, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, पारंपारिक वेशभुषा समितीचे अध्यक्ष प्रा. नितीन निपुंगे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या संकल्पनेतून प्रत्येक विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या पारंपारिक वेशभूषांचे सादरीकरण मंचावर करण्यात आले. उत्कृष्ट वेशभूषा व पारंपरिकता यांचा अनोखा संगम साधलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाने या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. विद्याथ, विद्याथनींच्या उस्फुर्त प्रतिसादामुळे ट्रॅडीशनल डे संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेमध्ये प्रा. राणी सोनवणे, प्रा. शुभदा आरडे, डॉ. विश्वास गवारी, प्रा. तुषार गालबोटे, प्रा. पूर्णांक चौधरी, प्रा. राजेश पिंपरकर यांनी या पारपंपारिक वेशभूषा समितीच्या सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.



### सेल्फी आणि छायाचित्रांसाठी गर्दी

*ट्रॅडीशनल डे निमित्त बहुतांश विद्याथ, विद्याथनी आपली आवडती वेशभूषा करून महाविद्यालयात दाखल झाले होते. एकमेकांसोबत सेल्फी काढण्याबरोबरच नटून थटून आलेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनींनी छायाचित्रकाराकडून छायाचित्रे काढून घेण्यासाठी गर्दी केल्याचे पहावयास मिळाले.*

# अवघ्या पाच वर्षात 30 घंटागाड्या निकामी !

## ९ गाड्यांना इंजिनच नाही ; ११ थेट भंगारात

### राज्य सरकारकडून महापालिकेला मिळाला होता २८ कोटींचा निधी

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

महापालिकेने ४ वर्षे ९ महिन्यांपूर्वी २०२० मध्ये खरेदी केलेल्या ६४ पैकी तब्बल ३० घंटागाड्या नादुरुस्त झाल्याने त्या वापरातून बाहेर काढण्यात आल्या आहेत. त्यापैकी नऊ गाड्यांना इंजिनच नसल्याचे तपासणीत समोर आले आहे. त्यासह इतर दोन अशा ११ घंटागाड्या चक्क भंगारात काढण्याची वेळ मनपा प्रशासनावर आली आहे.

सरकारने बीएस ४ वाहनांच्या विक्रीवर बंदी घातल्याची घोषणा केल्यानंतर अखेरच्या टप्प्यात महापालिकेने बीएस ६ ऐवजी या बीएस ४ घटागाड्यांची खरेदी केली होती. सरकारने घनकचरा व्यवस्थापन उपाययोजनांसाठी २८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. यातून ६४ घंटागाड्याची खरेदी करण्यात आली. बीएस ४ दर्जाचे इंजिन असलेल्या वाहनांची घाईघाईने खरेदी करून सरकारने दिलेल्या मुदतीत त्याची प्रादेशिक परिवहन विभागात नोंदणी करून घेतली. या ६४ गाड्यांपैकी ६२ गाड्या कचरा संकलन करणाऱ्या ठेकेदार संस्थेला भाडेतत्त्वावर देण्यात आल्या होत्या. त्यातील ३० वाहने निकामी झाल्याचे समोर आले आहे.मनपा उपायुक्तांनी केलेल्या तपासणीत ९ गाड्यांना इंजिन नसल्याचे व त्यासह इतर दोन अशा ११ गाड्या पूर्णपणे निकामी झाल्याचे समोर आले. दरम्यान, नादुरुस्त १९ गाड्यांची उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाणार आहे.

वाहने बंद असतानाही ठेकेदाराच्या ताब्यात महापालिकेने ६२ घंटागाड्या जुन्या ठेकेदार संस्थेला दिल्या होत्या. त्याच्या देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदार संस्थेची होती. ठेक्याची मुदत संपल्यावर ही वाहने ताब्यात घेताना त्यातील सुमारे १३ वाहने बंद अवस्थेत होती. तरीही महापालिकेने कोणतीही खातरजमा न करताच ती वाहने नव्या ठेकेदाराकडे वर्ग केली. घनकचरा विभागाने ही वाहने ताब्यात घेतलीच नसल्याचा पवित्रा घेतला आहे.

### खरेदी प्रक्रियेची चौकशी

*महापालिकेने खरेदी केलेल्या ३० घंटागाड्या नादुरुस्त आहेत. १९ गाड्यांची उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून तपासणी होणार आहे. ११ निकामी झालेल्या गाड्या लिलावात काढणार आहे. खरेदी प्रक्रियेची व त्यातील अनियमिततेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. अहवाल येताच दोषींवर जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.*

*– **यशवंत डांगे,** प्रशासक, महापालिका*





**निघोज येथे आयोजित बाल आनंद मेळाव्यात विविध पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले होते.**

# बाल आनंद मेळाव्यातून व्यवहार ज्ञानाचे धडे !

**निघोज : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाबरोबरच व्यवहार ज्ञानाचेही धडे मिळावेत यासाठी निघोज येथील प्रा. अन्सार पटेल संचलित सन शाईन प्री स्कुलमध्ये बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉलमध्ये विविध खाद्य पदार्थांची रेलचेल पहावयास मिळाली. प्रा. पटेल यांनी ही संकल्पना मांडल्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध स्टॉलच्या माध्यमातून पाणी पुरी, भेळ, गुलाब जामून, आप्पे, कचोरी, वडा पाव, इडली, मसाला पापड, भजी, पॅटिस तसेच पालेभाज्याही विक्रीसाठी ठेवल्या होत्या. बाल आनंद मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी सन शाईन स्कुलचे संचालक संपत रसाळ, पालक, प्रशासकीय अधिकारी, प्रशालेच्या को ऑडनेटर वैशाली ससाणे, कित केदारी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यार्थी पालकांनी या मेळाव्याचा आनंद लुटत विविध खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला. पालक व विद्यार्थ्यांनी या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com